# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 10.02.2026** **वार- मंगळवार**

---

**पुरंदर विमान**

पुरंदर येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाला राज्य शासनाने मान्यता दिल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर केली. या प्रकल्पासाठी आवश्यक जमीन अधिग्रहण प्रक्रिया 1 जून 2026 पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पुणे आणि पश्चिम महाराष्ट्राच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा आणि दूरगामी परिणाम करणारा निर्णय असल्याचे सांगत पुण्याचे खासदार आणि केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी या निर्णयाचे स्वागत केलं आहे. हा निर्णय उद्योग, व्यवसाय, आयटी क्षेत्र, पर्यटन तसेच कृषी निर्यातीसाठी निर्णायक ठरण्याबरोबरच वाढत्या प्रवासी आणि मालवाहतूक क्षमतेला मोठी चालना मिळणार असल्याचं मोहोळ यांनी म्हटलं आहे. यासाठी विशेष हेतू प्राधिकरणाची स्थापना करण्यात येणार असून या प्रकल्पाला गती देण्यासाठी, भुसंपादन तसंच अनुषांगिक बाबींसाठी सहा हजार कोटींचे कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या कर्जफेडीसाठी एमआयडीसी, एमएडीसी आणि सिडको यांची सहभागीदारी राहणार असून त्यांच्याकडे भागीदारीनुसार कर्ज फेडीची जबाबदारी देण्यात येणार आहे. या कर्जाला शासन मान्यता आणि हमी देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील रत्नपुरी मळा येथील 1 हजार एकर जमीन एमआयडीसीला हस्तांतरित करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे इंदापूर, बारामती तसच जिल्ह्यातील औद्योगिक गुंतवणुकीला गती मिळणार असून रोजगाराच्या संधी, स्थानिक उद्योजकतेला चालना आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळणार आहे.

**मोदी-पवार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांची दूरध्वनीवरून तब्येतीची विचारपूस केली. याशिवाय केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही पवार यांच्याशी दूरध्वनीवर संवाद साधत त्यांच्या आरोग्याबाबत चौकशी केली. यापूर्वी खासदार सुप्रिया सुळे यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत शरद पवार यांच्या तब्येतीबाबत माहिती दिली होती. पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकचे डॉक्टर अभिजित लोढा यांनीही शरद पवार यांच्या प्रकृतीत चांगली सुधारणा होत असल्याचे सांगितलं आहे.

**एचएकंपनी**

पुण्यातील हिंदुस्थान अँटिबायोटिक्स लिमिटेड या कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित 2007 वेतन सुधारणेचा प्रश्न, तसेच कोविड पश्चात काळात वाढत असलेल्या 'एव्हॅस्क्युलर नेक्रोसिस ऑफ हिप जॉइंट' या गंभीर आरोग्य समस्येवर राज्यसभा खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांनी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांची थेट भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या कर्मचाऱ्यांची वेतन सुधारणा अद्याप प्रलंबित असल्याने कर्मचाऱ्यांवर आर्थिक ताण आणि मनोबलावर विपरीत परिणाम होत असल्याचे कुलकर्णी यांनी स्पष्ट केले.

**विद्यापीठ**

आपण भारत विकसित होण्यासाठी 2047 पर्यंत का थांबायचे? त्या आधीच देश विकसित व्हायला हवा यासाठी नव्या पिढीने पुढाकार घेऊन जबाबदारी स्वीकारली पाहिजे, असे आवाहन जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 77 व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित मुख्य समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी महाविद्यालयीन स्तरावरील विविध पुरस्कार देण्यात आले.

**म्हाडा**

म्हाडा पुणे गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळातर्फे येत्या मार्चमध्ये पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात 3000 परवडणाऱ्या सदनिकांची सोडत काढण्यात येणार असल्याची माहिती पुणे मंडळाचे सभापती शिवाजीराव आढळराव-पाटील यांनी दिली आहे. आज पुण्यात 4186 सदनिकांसाठी संगणकीय सोडत आढळराव-पाटील यांच्या हस्ते काढण्यात आली त्यावेळी ते बोलत होते. म्हाडाचा पारदर्शक कारभार आणि दर्जेदार बांधकामामुळे जनतेचा विश्वास वाढत असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी 2 लाख 15 हजार 9 शे 65 अर्ज प्राप्त झाले होते.

**सुर्यदत्त**

समाजाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना एकाच व्यासपीठावर सन्मानित करण्याची संधी म्हणजे समाजाच्या प्रबोधनाचा प्रभावी मार्ग असल्याचं प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश उदय लळित यांनी केलं आहे. पुण्यातील सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या 28 व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित 'सूर्यदत्त राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार' आणि  सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार' वितरण समारंभात ते आज बोलत होते. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना गौरविण्यात आले. पद्मश्री परमपूज्य आचार्य डॉ. चंदनाजी महाराज यांना 'सूर्यदत्त ग्लोबल पीस गांधीयन फिलॉसॉफी अवॉर्ड 2026', तर माजी सरन्यायाधीश उदय लळित यांना 'सूर्यदत्त राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आले.

**सप्तशक्ती**

पुण्यातील मा स गोळवलकर गुरुजी विद्यालयाच्या गणेश सभागृहात आज सप्तशक्ती संगम-महिला संमेलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रशालेतील माता पालक संघाच्या अंतर्गत विद्याभारतीच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांतातर्फे याचं आयोजन करण्यात आलं होतं. शिक्षण विवेक मासिकाच्या संपादक प्राजक्ता वैद्य यांनी यावेळी मार्गदर्शन केले.

**हवामान-IMD**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 33 तर किमान तापमान 15 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत ; उद्या पुन्हा भेटूयात ताज्या पुणे वृत्तांतमध्ये संध्याकाळी सहा वाजता ; तो पर्यंत नमस्कार.**